# सातारा पालिकेत सत्ताधाऱ्यांचाच रणसंग्राम

## बनकर विरुद्ध खंदारे संघर्षाने सभागृह दणाणले; दोन तासांच्या गदारोळात १५ विषय मंजूर

**सातारा/प्रतिनिधी:–**

सातारा नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत बुधवारी सत्ताधारी भाजपमधील अंतर्गत संघर्ष उघडपणे समोर आला. उपनगराध्यक्ष ड. दत्ता बनकर आणि बांधकाम सभापती बाळासाहेब खंदारे यांच्यातील जोरदार शाब्दिक युद्धामुळे सभागृह अक्षरशः रणांगण बनले. आरोप, टोलेबाजी, अरे-तुरेची भाषा आणि सततच्या हस्तक्षेपामुळे नगराध्यक्ष अमोल मोहिते यांच्यासमोर सभेचे कामकाज सुरळीत ठेवण्याचे मोठे आव्हान उभे राहिले.



सभेच्या प्रारंभीच विषय मंजुरीच्या पद्धतीवरून खंदारे यांनी उपनगराध्यक्ष बनकर यांच्यावर थेट निशाणा साधत सभागृहात लोकशाहीची गळचेपी सुरू आहे असा गंभीर आरोप केला. विषयांचे वाचन न करता मंजुरीचा सपाटा लावला जातो. ही हुकूमशाही आम्ही चालू देणार नाही, असा आक्रमक इशारा त्यांनी दिला. त्यावर बनकर यांनीही जोरदार प्रत्युत्तर दिल्याने वातावरण क्षणात तापले.

दोन्ही नेत्यांमधील वाद इतका वाढला की काही काळ सभागृहात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. नगराध्यक्ष अमोल मोहिते यांनी वारंवार हस्तक्षेप करत सभागृहाची प्रतिष्ठा राखा असे आवाहन केले. मात्र आरोप-प्रत्यारोपांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नव्हते. काही नगरसेवकांनी तर बनकर यांच्या कार्यशैलीची तुलना थेट अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शैलीशी करत सभागृहात खसखस पिकवली.

दरम्यान, नगरसेविका हेमलता ननावरे यांनी शाहूनगरमधील पाणीटंचाईचा प्रश्न उपस्थित करत प्रशासनाला धारेवर धरले. त्यावर खंदारे यांनी अधिकार नसलेल्या लोकांकडे अर्ज करून उपयोग नाही, थेट मुख्याधिकाऱ्यांकडे जा, असा टोला लगावत पुन्हा बनकर यांना लक्ष्य केले.

सभेत आणखी एक वादग्रस्त मुद्दा तेव्हा निर्माण झाला, जेव्हा एका नगरसेविकेने मागील सभेत नगरसेवकांवर करण्यात आलेल्या आरोपांबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. पुरावे नसताना बदनामी का केली? असा सवाल करत त्यांनी संतप्त भूमिका घेतली. विभागीय चौकशी समितीचा अहवाल आल्यानंतर संबंधितांची वेतनवाढ रोखली जाईल, असे आश्वासन नगराध्यक्षांनी दिले. मात्र समाधान न झाल्याने संबंधित नगरसेविकेने सभात्याग केला.

सभेत 'नारीवंदन विधेयका'च्या समर्थनार्थ ठराव मांडण्यात आला. नगरसेविका सिद्धी पवार, हेमलता भोसले आणि सावित्री बडेकर यांनी महिला सक्षमीकरणावर जोर देत विरोधी प्रवृत्तींचा निषेध केला. यावेळी सिद्धी पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आपत्कालीन बचत संकल्पनेचा उल्लेख करत नागरिकांनी आर्थिक शिस्त अंगीकारावी, असे आवाहन केले.

माजी उपनगराध्यक्ष शंकर माळवदे यांनी आस्थापना विभागातील पदोन्नती प्रक्रियेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत काही महत्त्वाची कागदपत्रे गायब झाल्याचा आरोप केला. याबाबत संपूर्ण माहिती सभागृहासमोर मांडली जाईल, असे आश्वासन नगराध्यक्षांनी दिले.

पाणीटंचाईच्या मुद्द्यावरूनही प्रशासनावर जोरदार टीका झाली. नगरसेवक सुशांत महाजन यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर निष्क्रियतेचा आरोप करत तातडीची बैठक घेण्याची मागणी केली. त्यावर नगराध्यक्ष मोहिते यांनी संबंधित अधिकाऱ्यांना खरमरीत नोटीस देण्याचे आदेश दिले.

वाद, टोलेबाजी आणि आरोपांच्या धुरळ्यात तब्बल दोन तास चाललेल्या या बैठकीत अखेरीस १५ विषयांना मंजुरी देण्यात आली. तसेच शहरातील पर्यावरण संवर्धनासाठी पुढील पाच वर्षांसाठी १५ सदस्यीय वृक्ष समितीची घोषणाही करण्यात आली.



# पुनर्वसित भांबे येथे कोटींच्या कामांचा शुभारंभ

## आ.मनोज घोरपडे; पुनर्वसित गावांना मुख्य प्रवाहात आणणार

**कराड/प्रतिनिधी : –**

कराड उत्तर मतदारसंघातील पुनर्वसित गावांच्या विकासासाठी आपण कटिबद्ध असून, आगामी काळात कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देत गावांना मूलभूत सुविधांनी सक्षम केले जाईल, अशी ग्वाही कराड उत्तरचे आमदार मनोज घोरपडे यांनी दिली.

भांबे (ता. कराड) येथे विविध विकास कामांच्या भूमिपूजनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्य मदनभाऊ काळभोर, पालगटचे नेते सुरेश पाटील, पंचायत समिती सदस्य धैर्यजा माने, रणजित पाटील, प्रकाश काटे आदी प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

आमदार घोरपडे म्हणाले, भांबे हे छोटे पुनर्वसित गाव असले तरी गावासाठी तब्बल १ कोटी ३५ लाख रुपयांची विकासकामे मंजूर करण्यात आली आहेत. कराड उत्तरमध्ये अशी ३५ पुनर्वसित गावे आहेत. गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून या गावांकडे दुर्लक्ष झाले असून अनेक मूलभूत सुविधांपासून ग्रामस्थ वंचित राहिले आहेत. आता या गावांचा सर्वांगीण विकास करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जाणार आहेत.

कार्यक्रमात सुरेश पाटील, संदीप काटे आणि हणमंत काटे यांनीही मनोगत व्यक्त करत गावाच्या विकासासाठी सहकार्य करण्याची भूमिका मांडली. यावेळी दिगंबर बिसे, अनिल माने, अशोक पाटील, हणमंत काटे, सरस्वती गुरव, दादासो काटे, सुभाष काटे, अंकुश काटे, सचिन काटे, जयसिंग काटे, अक्षय यादव, चंद्रकांत काटे, दत्तात्रय काटे, विलास काटे, गणेश काटे, महेश काटे, सुनील काळभोर, सतीश शिंदे, संतोष यादव, नवनाथ मोरे, लक्ष्मण मोरे यांच्यासह ग्रामस्थ महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रदेश दौरा रद्द पण ताफा कधी कमी!

**पाटण/प्रतिनिधी:–**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी प्रेस नोट काढत देशहिताला प्राधान्य देत खाजगी प्रदेश दौरा रद्द केल्याचे जाहीर केले. या निर्णयाबद्दल निकटवर्तीयांच्यात पालकमंत्री यांचे सर्वत्र कौतुक होत असले तरी स्थानिक पातळीवरील शासकीय दौऱ्यात अथवा खाजगी दौऱ्यात त्यांच्या वाहनांच्या ताफ्यात मागे पुढे असणाऱ्या तीन- चार पोलिस व्हॅन, तीन- चार शासकीय गाड्या, चार- पाच कार्यकर्त्यांच्या गाड्या अशा किमान दहा- बरा गाड्याचा ताफा पहायला मिळतो. हा मागे-पुढे फिरणाऱ्या गाड्यांचा ताफा पालकमंत्र्यांनी कमी केला तर पॅट्रोल डिझेलची मोठी बचत होऊन खरे राष्ट्रहित जपले जाईल. असे बोलले जात आहे.

देशहिताच्या सेवेसाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच भारतीय नागरिकांना आवाहन करत पॅट्रोल, डिझेल, खाद्य तेलाची बचत करा. वैयक्तिक प्रवास टाळत ऑफिसला, कामावर, व्यवसायाच्या ठिकाणी जाताना एकत्र प्रवास करा. रेल्वे, मॅट्रो ट्रेनचा वापर करा, परदेश दौरे टाळा, सोने खरेदी करणे टाळा, विनाकारण वाहनांचा वापर करु नका असे आवाहन करत देशावर येणाऱ्या पुढील संकटाची चाहूल दिली आहे. यातून प्रत्येक भारतीय नागरिकांनी पंतप्रधानांच्या आवाहनाला जेवढा शक्य होईल तेवढा प्रतिसाद देणे अपेक्षित आहे.



पंतप्रधानांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांनी खाजगी प्रदेश दौरा रद्द केल्याचे जाहीर केले.त्यांच्या या निर्णयाचे निकटवर्तीयांकडून स्वागत व कौतुक होत आहे. या निर्णयाबरोबरच त्यांनी सोबत असणाऱ्या जादा गाड्यांचा लवाजमा कमी करावा आणि जादाचे जळणारे पॅट्रोल डिझेलची बचत करुन पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देत राष्ट्रहित जपून पालकमंत्री म्हणून सातारा जिल्ह्यातील जनतेला पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद देण्याचे आवाहन करावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मंत्री झाल्यापासुन राष्ट्रहित जपले

महाराष्ट्र राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री साताराचे सुपुत्र श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी मंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर अवघ्या दोन चार दिवसांत मी मंत्री झालो असलो तरी पोलिस स्वरंक्षण घेणार नाही आणि माझ्या गाडीचा सायरन वाजणार नाही. हे जाहीर केले. आणि ते पाळलेही त्यांचा मंत्रीपद मिळालेनंतरचा हा पहिला स्वघोषित निर्णय सातारा जिल्ह्याच्याच नाही तर संपूर्ण राज्याच्या जनतेला भावला मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक झाले आणि आजही होत आहे. कारण ते जिल्ह्यात अथवा राज्यात शासकीय दौऱ्यात गेल्यानंतर त्यांच्या वाहनांच्या ताफ्यात केवळ दोन किंवा तीन गाड्या पहायला मिळतात. विनाकारण ते अधिकारी कार्यकर्त्यांना पाठीमागून फिरवत नाहीत. याबाबतीत उदाहरणार्थ द्यायचं झालं तर पाटण तालुक्यात अनेकदा त्यांचे दौरे झाले तीन किंवा चार गाड्यांपेक्षा अधिक गाड्या त्यांच्या ताफ्यात दिसल्या नाहीत. छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले हे लातुर जिल्ह्याचे पालकमंत्री देखील आहेत. गेल्याच महिन्यात एप्रिल १८ आणि १९ तारखेला लातुर जिल्ह्यातील उदगीर येथे अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राष्ट्रीय अधिवेशन झाले. या अधिवेशनाचे ते स्वागत अध्यक्ष होते. या अधिवेशनाला मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची उपस्थिती सर्वांचे आकर्षण होते. यावेळी देखील त्यांच्या सोबत गाड्यांचा मोठा लमाजमा नव्हता सायरन देखील वाजला नाही. अगदी साधेपणाने ते कार्यक्रम ठिकाणी आले. आणि सर्वांचे मन जिंकून गेले. मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गेले अठरा महिने स्वनिर्णयातून घेतलेल्या निर्णयातून एकप्रकारे राष्ट्रहित जपले जात असल्याचे बोलले जात आहे. अजूनही छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या या निर्णयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

अशा प्रकारे राज्यातील सर्वच मंत्र्यांनी मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या निर्णयाचे अनुकरण करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला प्रतिसाद दिला तर राज्यात सर्वात मोठ्या प्रमाणात राष्ट्रहित जपले जाईल आणि त्यांचे अनुकरण राज्यातील जनता देखील तेवढ्यातच मोठ्या प्रमाणात करेल ही अपेक्षा सर्वत्र व्यक्त केली जात आहे.

# कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचे धरणे आंदोलन यशस्वी

**फलटण/प्रतिनिधी : –**

पुणे येथील शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाच्या वतीने सोमवारी (दि. ११) धरणे आंदोलन पुकारण्यात आले होते. या आंदोलनांमध्ये महाराष्ट्राच्या विविध भागांमधून शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे उपस्थिती दर्शवली. यामध्ये प्रामुख्याने सातारा जिल्हा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचा सहभाग लक्षणीय व उत्स्फूर्त होता.

या आंदोलनाला पुणे विभागीय शिक्षक आमदार जयंत आसगावकर, नाशिक पदवीधर मतदार संघाचे आमदार सत्यजित तांबे, महासंघाचे अध्यक्ष डॉ. संजय शिंदे, सातारा जिल्हाध्यक्ष व सर्व सन्माननीय पदाधिकारी उपस्थित होते.




कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या संच मान्यतेचे प्रचलित निकष बदलून नव्या निकषाने संच मान्यता होणार होती. त्यामुळे राज्यभरातील जवळजवळ दहा ते पंधरा हजार शिक्षक अतिरिक्त होण्याचा धोका निर्माण झाला होता. परंतु, सोमवारी झालेल्या महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक महासंघाच्या धरणे आंदोलनामुळे सन्माननीय आमदार, राज्य अध्यक्ष व शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक यांच्यामध्ये संच मान्यते विषयी सकारात्मक चर्चा होऊन शासनाच्या नियमाप्रमाणेच संच मान्यता करण्याचे आश्वासन शिक्षण आयुक्त यांनी याप्रसंगी दिले.

या धरणे आंदोलनासाठी सातारा जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय संघटनेचे सचिव प्रा. गोविंद भाऊसाहेब वाघ यांनी माननीय खासदार व आमदार यांच्या पाठिंब्याची पत्र मिळवून धरणे आंदोलन यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

सातारा जिल्हा कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेचे अध्यक्ष विलास खंडाईत, उपाध्यक्ष सुनील शिंदे व जिल्हासचिव गोविंद वाघ, सहसचिव सुरेंद्र फाळके, दिलीप माने व कार्यकारणीचे सर्व सदस्य उपस्थित होते. भविष्यकाळात जर शासनाने शिक्षकांविरुद्ध अन्यायकारक कायदे केले. तर सर्व शिक्षकांनी त्याचा प्रतिकार करण्यासाठी एकजूट व्हावे, असे आवाहन याप्रसंगी संघटनेच्या वतीने करण्यात आली.




# वसंतगड विद्यालयाचा १० वी सेमीचा निकाल १०० टक्के

**तांबवे/प्रतिनिधी:–**

वसंतगड ता. कराड येथील श्री चंद्रसेन शिक्षण संस्थेच्या. श्री वि. ग .माने हाय व ज्युनि कॉलेज चा इयत्ता १० वी चा सेमी इंग्रजी माध्यमाचा निकाल १००% लागला. तसेच मराठी माध्यमाचा निकाल ९७.३०% लागला आहे फेब्रुवारी /मार्च २०२६ परीक्षेला विद्यालयाचे एकूण १०४ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते.३० विद्यार्थ्यांनी विषेश प्रविण्य मिळवले. विद्यालयाने यंदाही उज्वल यशाची परंपरा कायम राखली.

विद्यालयाचे प्रथम पाच विद्यार्थी - १) कु पाटील शरयू. ९२.००%, २) शिंदे हर्षल.८९.६०%, ३)कु महाडिक ऋतुकी ८८.६०%, ४) कु मोहिते श्रेया. ८८.२०%, ५) कु कदम वैष्णवी.. ८७.८०%

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे श्री चंद्रसेन शिक्षण संस्थेचे सचिव रघुनाथ नलवडे (दादा ), उपाध्यक्ष महिपती कोकरे, हणमंतराव नलवडे, चंद्रकांत पाटील, तानाजीराव वाघमारे सरपंच अँड अमित नलवडे मुख्याध्यापक मंदार दीक्षित सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी ग्रामस्थ पालक इ नी अभिनंदन केले.

# उपजिल्हा रुग्णालय कामथे येथे साकिब शिकलगार यांचा विशेष सन्मान

**पुसेगाव/प्रतिनिधी : –**

जागतिक परिचारिका दिनाचे औचित्य साधून उपजिल्हा रुग्णालय कामथे, चिपळूण (रत्नागिरी) येथे एका विशेष समारंभात नर्सिंग ऑफिसर साकिब नासिरहुसेन शिकलगार यांचा सन्मान करण्यात आला. साकिब शिकलगार हे सध्या कामथे रुग्णालयात कौतुकास्पद रुग्णसेवा बजावत आहेत. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा गौरव करण्यात आला.

याप्रसंगी उपजिल्हा रुग्णालय कामथे, चिपळूणचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. विजय कांबळे यांच्या आदेशानुसार, ग्रामीण रुग्णालय संगमेश्वरचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजय सानप यांच्या हस्ते साकिब शिकलगार यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी साकिब शिकलगार यांच्या समर्पणाची भावना आणि कामाप्रती असलेल्या निष्ठेबद्दल त्यांचे कौतुक केले.



साकिब शिकलगार हे रुग्णालयातील वैद्यकीय आणि प्रशासकीय यंत्रणेमध्ये उत्कृष्ट कामगिरी बजावत आहेत. विशेषतः सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश, मुख्यमंत्री आणि उप-मुख्यमंत्री यांच्या रत्नागिरी दौऱ्यादरम्यान, व्हीव्हीआयपी आणि व्हीआयपी प्रोटोकॉलअंतर्गत वैद्यकीय सेवा पुरवण्याची महत्त्वाची आणि जबाबदारीची भूमिका त्यांनी उत्तमरित्या पार पाडली आहे. त्यांच्या या निष्ठापूर्वक सेवेबद्दल उप-जिल्हा रुग्णालय कामथे येथे त्यांचा सन्मान करण्यात आला.

या सन्मानाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे साकिब शिकलगार यांचा इथपर्यंतचा प्रवास हा जिद्द आणि कष्टाचा आहे. मुळचे खटाव तालुक्यातील कलेढोण येथील असलेल्या साकिब यांनी लहानपणी अनेक शस्त्रक्रिया आणि शारीरिक आव्हानांना सामोरे जावे लागले. मात्र, आई-वडिलांच्या जिद्द आणि स्वतःच्या धैर्याने त्यांनी त्या कठीण काळावर मात केली. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी कर्नाटक येथे नर्सिंग क्षेत्राची निवड करून सेवाभावी वाट निवडली. सेवासदन, सिनर्जी आणि अविनाश पाटील सर यांच्यासोबत काम करताना त्यांनी आपली प्रामाणिकता आणि कर्तव्यनिष्ठा सिद्ध केली आहे.

नर्सिंग हे केवळ एक व्यवसाय नसून ती एक समर्पणाची भावना आहे. क्षयत किंवा चऊळ-ढइ सारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त रुग्णांची सेवा करतानाही साकिब यांनी कधीही संकोच बाळगला नाही. त्यांची निःस्वार्थ सेवा हीच त्यांची खरी ओळख आहे. नर्सिंग हा केवळ एक व्यवसाय नाही, तर ती मर्यादा ओलांडून सेवा करण्याची एक वचनबद्धता आहे, हे वाक्य त्यांच्या कार्याला तंतोतंत लागू पडते.

या सन्मानाबद्दल डॉ. वसीम शिकलगार यांनी देखील साकिब यांचे अभिनंदन केले आहे. साकिब शिकलगार यांनी आपल्या कुटुंबाचे आणि शिकलगार समाजाचे नाव उंचावले असून, त्यांच्या पुढील वाटचालीस त्यांनी अनेक शुभेच्छा दिल्या आहेत.

# सृष्टी शिंदेला दहावीत ९८ टक्के

## गणितात १०० पैकी १०० गुण; पाटण तालुक्यात प्रथम येण्याचा बहुमान

**पाटण/प्रतिनिधी : –**

नुकत्याच झालेल्या इयत्ता दहावीच्या निकालात शिवांजली इंग्लिश मिडीयम स्कूल नाडे (नवारस्ता), ता. पाटण येथील विद्यार्थीनी सृष्टी तुकाराम शिंदे हिने १०० पैकी ९८ टक्के गुण मिळवून पाटण तालुक्यात प्रथम येण्याचा बहुमान मिळवला.

विशेष म्हणजे तिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळाले आहेत. या उज्वल यशाबद्दल येराड पं. स. गणातील पंचायत समिती सदस्य सौ. विद्या शिंदे यांची कन्या सृष्टी शिंदेचे सर्वत्र कौतुक होत असून, पालकमंत्री शंभूराज देसाई, लो.बा.दे.स. साखर कारखान्याचे अध्यक्ष यशराज देसाई, पाटण पं.स.



सभापती सौ. सविता पवार, उपसभापती विजय पवार, शिवांजली शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकारी, संचालक, प्राचार्य, शिक्षक आदी मान्यवरांनी सृष्टीचे अभिनंदन केले.



# स्व.शेठ.रा.की.लाहोटी कन्या प्रशालेचा दहावी निकाल शंभर टक्के

**कराड/प्रतिनिधी:–**

येथील स्व. शेठ. रामबिलास किसनलाल लाहोटी कन्या प्रशाला, कराड यांनी दहावी परीक्षेच्या निकालात यंदाही शंभर टक्के यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. प्रशालेतील विद्यार्थिनींनी गुणवत्तापूर्ण निकालाची परंपरा पुढे नेत विविध विषयांमध्ये उत्कृष्ट गुण मिळवून शाळेचा गौरव वाढविला.

प्रशालेतील गुणवंत विद्यार्थिनींमध्ये हिंगमिरे अंजली नंदकिशोर हिने ९८.८० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. गोरे शर्वरी दादासाहेब हिने ९८.६० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक मिळविला, तर कणसे दीक्षा कृष्णत हिने ९७.६० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच गुरव सई उमेश व पाटील मृदुला संदीप यांनी प्रत्येकी ९६.६० टक्के, काकडे अनुराधा दीपक व पाटील वेदांतिका चंद्रकांत यांनी प्रत्येकी ९६.४० टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. संस्कृत विषयात १३ विद्यार्थिनींनी तर गणित विषयात कुमारी मृदुला संदीप पाटील या विद्यार्थिनीने १०० गुण प्राप्त केले.या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे शिक्षण मंडळ कराडचे सर्व पदाधिकारी, प्रशालेच्या मुख्याध्यापिका, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आनंदराव चव्हाण विद्यालयाचा दहावीचा ९५.२९ टक्के निकाल

## वैष्णवी पांढरपट्टे प्रथम, वैष्णवी सावंत द्वितीय; २० विद्यार्थ्यांचे विशेष प्राविण्य

**कराड/प्रतिनिधी : –**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी परीक्षेत श्री मळाईदेवी शिक्षण संस्थेच्या आ.च. विद्यालय व आदर्श ज्युनिअर कॉलेज, मलकापूरने यंदाही उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाने ९५.२९ टक्के निकालाची भव्य नोंद करत शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे.

विद्यालयातील वैष्णवी राजेंद्र पांढरपट्टे हिने ९७.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. वैष्णवी राहुल सावंत हिने ९६.८० टक्के गुणांसह द्वितीय, तर शिवराज शरद शेवाळे याने ९६ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळविला. अनुज प्रकाश पाटील याने ९१.२० टक्के



गुणांसह चतुर्थ, तर श्रीराज महेश तनंगे याने ८८.२० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक संपादन केला.

विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध विषयांत उल्लेखनीय यश संपादन केले असून, विशेष प्राविण्यासह २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तसेच प्रथम श्रेणीत ६३, द्वितीय श्रेणीत ५९ आणि पास श्रेणीत १८ विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच शासकीय शिष्यवृत्ती परीक्षा, विविध स्पर्धा परीक्षा आणि क्रीडा क्षेत्रातही विद्यालय सातत्याने उल्लेखनीय कामगिरी करत आहे. त्यामुळे इयत्ता पाचवी ते दहावी मराठी व सेमी इंग्रजी माध्यमाच्या प्रवेशासाठी पालकांकडून विद्यालयाला मोठी पसंती मिळत असल्याचे चित्र आहे.

या यशाबद्दल संस्थेचे सचिव शेतीमित्र अशोकराव थोरात, उपाध्यक्ष भास्करराव पाटील, मार्गदर्शक संचालिका डॉ. सौ. स्वाती थोरात, संचालक मंडळ, मुख्याध्यापक ए. बी. थोरात, उपमुख्याध्यापक एम. पी. फराळे, पर्यवेक्षक जे. बी. पाटील, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच पालकवर्ग यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# उंब्रजमध्ये आज 'कृष्णकमल'चा सोनेरी शंखनाद..!

## 'कृष्णकमल ज्वेलर्स'ची दुसरी शाखा ग्राहकांच्या सेवेत

पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या व गतिमान बाजारपेठांपैकी एक म्हणून कराडची ओळख आहे. येथे पारंपरिक ज्वेलर्सची मोठी परंपरा असतानाच, बेलवडे हवेली येथील दूरदृष्टी असलेले उद्योगपती बाबूराव जगन्नाथ पवार (शेठ) यांनी तालुक्यातील सामान्य कुटुंबांना शुद्ध, हॉलमार्क दागिने वाजवी दरात मिळावेत या उद्देशाने २००२ साली कराडमध्ये कृष्णकमल ज्वेलर्स हे दागिन्याचे भव्य तीन मजली शोरूम उभारले. २४ वर्ष ग्राहकांचा विश्वास याच्या जोरावर आता कृष्णकमलची दुसरी शाखा उंब्रज येथे लोकांच्या सेवेत सुरू होत आहे. गुरुवार दिनांक १४ मे रोजी सिक्कीमचे माजी राज्यपाल श्रीनिवास पाटील यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत शोरूमचे भव्य उद्घाटन होत आहे.






२४ वर्षांपूर्वी २००२ मध्ये बाबुराव पवार यांनी शनिवार पेठेत 'कृष्णकमल ज्वेलर्स' हे भव्य, तीन मजली सुसज्ज शोरूम कराडकरांच्या सेवेत आणले. 'शुद्ध व चोख दागिने, व्यवहारातील १००% विश्वासार्हता आणि ग्राहकांची गरज हाच केंद्रबिंदू' या त्रिसूत्रीवर त्यांनी व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. पारदर्शक वजन, कोणतीही लपवाछपवी नसलेले दर आणि विक्रीनंतरची उत्तम सेवा यामुळे अल्पावधीतच कृष्णकमल ज्वेलर्स हे नाव कराड तालुक्यासह सातारा सांगली मध्ये प्रत्येक घरात पोहोचले. आज २४ वर्षांनंतरही सोने घ्यायचे म्हणजे कृष्णकमल ज्वेलर्स हा विश्वास ग्राहकांच्या मनात कायम आहे.

कराड येथील मुख्य शोरूममध्ये केवळ कराड शहरच नव्हे तर तालुक्यासह, पाटण सातारा सांगली येथील ग्राहकांचीही मोठी वर्दळ असते. उंब्रजसह त्या भागातील महिला व कुटुंबांना सोने खरेदीसाठी प्रवास करून कराडला यावे लागत होते. ग्राहकांचा हाच वेळ, श्रम व पैसा वाचावा, त्यांची सोय गावातच व्हावी, या तळमळीतून बाबूराव पवार यांच्या मनात काही वर्षांपूर्वी उंब्रजमध्ये दुसरी शाखा सुरू करण्याची योजना आली. अनेक अडचणींवर मात करत, जागेची निवड, बांधकाम व अंतर्गत सजावट पूर्ण करून अखेर त्यांनी पाहिलेले दुसऱ्या शाखेचे स्वप्न आता सत्यात उतरत आहे. गुरुवार, दिनांक १४ मे २०२६ रोजी सकाळी १० वाजता उंब्रज येथे कृष्णकमल ज्वेलर्सच्या दुसऱ्या शाखेचा दिमाखदार शुभारंभ सोहळा संपन्न होत आहे. या नवीन दालनाचे उद्घाटन सिक्कीमचे माजी राज्यपाल तथा माजी खासदार श्रीनिवास पाटील यांच्या शुभहस्ते होणार आहे. या सोहळ्यासाठी बाबूराव जगन्नाथ पवार (शेठ) व त्यांचे बंधू उत्तमराव जगन्नाथ पवार हे निमंत्रक म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. उंब्रजच्या मुख्य बाजारपेठेतील भाजी मंडई परिसरात हे अत्याधुनिक, वातानुकूलित शोरूम उभारण्यात आले आहे. उंब्रज हे कराड नंतर तालुक्यातील दुसरे मोठे व्यापारी केंद्र आहे. कृष्णकमल ज्वेलर्सच्या प्रवेशामुळे उंब्रजच्या बाजारपेठेच्या वैभवात आणखी भर पडणार असून, परिसरातील नागरिकांना १४ मे रोजी सकाळी १० वाजता होणाऱ्या या शुभारंभ सोहळ्यास सहकुटुंब उपस्थित राहून वास्तूस व नवीन व्यवसायास शुभाशीर्वाद द्यावेत असे आग्रहाचे निमंत्रण बाबुराव पवार व उत्तमराव पवार यांनी दिले आहे.

शुद्ध व चोख दागिने देणे, ग्राहकांच्या विश्वासास पात्र ठरणे हे आम्ही २००२ पासून व्रत म्हणून जपले आहे. ग्राहक हेच आमचे दैवत मानून त्यांच्या गरजेनुसार विविध बचत योजना राबवल्या आणि त्या प्रामाणिकपणे प्रत्यक्षात अमलात आणल्या. आज २२ वर्षांनंतरही कृष्णकमल ज्वेलर्सने ग्राहकांना दिलेली प्रामाणिक सेवा व त्यांनी आमच्यावर टाकलेल्या अतूट विश्वासाच्या जोरावरच आम्ही उंब्रज येथे दुसऱ्या शाखेचा विस्तार करत आहोत. उंब्रज येथील नवीन दालनातील विविध व नावीन्यपूर्ण दागिन्यांची आपण आवर्जून खरेदी करावी आणि आम्हाला आपली सेवा करण्याची संधी द्यावी. आपला विश्वास हेच आमचे भांडवल आहे आणि तोच जपण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

बाबूराव पवार (शेठ)
सर्वेसर्वा, कृष्णकमल ज्वेलर्स, कराड-उंब्रज

**शब्दांकन**
**सुरेश डुबल – कराड**